दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे

वर्ष ५ । अंक १९९ । बुधवार २९ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.

- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75




**मालट्रकचा चक्काचूर, सुदैवाने चालक-वाहक बचावले...**

छत्रपती संभाजीनगर येथून पुण्याकडे मका घेऊन जाणारा मालट्रक स्टेअरिंग लॉक झाल्याने बुधवारी पहाटे तीनच्या सुमारास इंद्रायणी चौकात दुभाजकाला धडकून उलटला. या अपघातात मालट्रकचा अक्षरशः चक्काचूर झाला. सुदैवाने चालक-वाहक बचावले तसेच इतर वाहनालाही हानी पोहचली नाही. या अपघातानंतर महामार्गावर सर्वत्र मक्याची पोती पडल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. (छाया - विजय मते)

## झोपलेल्या वृद्धेचे मंगळसूत्र लांबविणारा सराईत गजाआड

### एमआयडीसी पोलिसांची कारवाई  मुद्देमाल हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** घरात झोपलेल्या वृद्ध महिलेचे मंगळसूत्र उशीखालून लांबविणाऱ्या सराईत गुन्हेगाराला एमआयडीसी पोलिसांनी शिताफीने गजाआड केले आहे. करण ऊर्फ डोडो गौतम औताडे (वय २२ वर्ष, रा. आदर्शनगर, एमआयडीसी) असे त्याचे नाव असून या तपासात सीसीटीव्हीचा मोठा आधार ठरला.

दिनांक ६ मार्च रोजी घडलेल्या या घटनेबाबत सौ. राजस दीपक पंचमुख (वय ६० वर्ष, रा. आदर्शनगर, एमआयडीसी, अहिल्यानगर ) यांनी फिर्याद दिली होती. झोपताना उशीखाली डबीत काढून ठेवलेले मणी मंगळसू रात्री दहा ते पहाटे पाच या कालावधीत झोपेत असताना चोरट्याने लांबविले होते. त्यावरून एमआयडीसी पोलीस



ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाआधारे सदरचा गुन्हा हा करण ऊर्फ डोडो गौतम औताडे याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला बालिकाश्रम रोड परिसरातून शिताफीने पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याच कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीतील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात तीन, तर तोफखाना पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसीचे सपोनि माणिक बी. चौधरी, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ राजू सुद्रीक, पोहेकॉ सचिन आडवल, पोकॉ नवनाथ दहिफळे, पोकॉ किशोर जाधव, पोकॉ अक्षय रोहोकले, पोकॉ सचिन हरदास, पोकॉ राहुल गुंडु, पोकॉ नितीन शिंदे यांच्या पथकाने केली.

२०२६ जनगणनेची तयारी वेगात

## अहिल्यानगरमध्ये दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्णत्वाकडे

### शिक्षक व महापालिका कर्मचाऱ्यांना सखोल मार्गदर्शन । टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण प्रक्रिया सुरू; नागरिकांनी जनगणना प्रक्रियेला सहकार्य करण्याचे प्रशासनाचे आवाहन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशात २०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महापालिकेच्या माध्यमातून जनगणनेच्या तयारीला वेग आला असून, दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडत आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या हॉटेल मॅनेजमेंट इमारतीमध्ये आयोजित या प्रशिक्षणात शिक्षक तसेच महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहे. महानगरपालिका समिती क्रमांक ३ अंतर्गत जनगणना अधिकारी शाम गोडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण होत आहे .

प्रशिक्षक मीरा जाधव व गीतांजली जोंधळे यांनी जनगणना प्रक्रियेचे महत्त्व, माहिती संकलनाची अचूक पद्धत, नागरिकांशी संवाद कसा साधावा यासह विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करत आहे . जनगणना करताना आवश्यक असलेली दक्षता, माहितीची गोपनीयता आणि अचूकता यावर विशेष भर देण्यात येत आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण २५ ते २७ एप्रिल दरम्यान पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण २८ ते ३० एप्रिल या कालावधीत सुरू आहे. पुढील तिसरा टप्पा २ ते ४ मे दरम्यान आयोजित करण्यात येणार असून, अंतिम प्रशिक्षण ५ ते ७ मे या कालावधीत पार पडणार आहे. यामध्ये उर्वरित प्रगणक, पर्यवेक्षक तसेच राखीव व गैरहजर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असल्याने नागरिकांनी प्रगणकांना योग्य व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जनगणना अधिकारी शाम गोडळकर यांनी केले आहे. या प्रशिक्षण सत्रासाठी कार्यालयीन कर्मचारी शाम सुदाम शिंदे व आतिफ तक्सीर शेख यांचीही उपस्थिती होती. जनगणना यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन केले असून, प्रशिक्षणाच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यावर भर दिला जात आहे.

## उपमहापौर धनंजय जाधव चषक जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा ३ मे रोजी

### विजयी झालेल्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आली असून ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी खुली आहे.



नवनिर्वाचित उपमहापौरांनी महापालिकेमध्ये केलेल्या धडाकेबाज कामगिरीला सलाम म्हणून ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

ही स्पर्धा रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी ९.३० वाजता नगर येथील गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे सुरू होणार आहे. स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. अंतिम निकालानुसार प्रत्येकी २ मुले व २ मुली राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. निवड झालेल्या खेळाडूंची राज्य निवड चाचणी स्पर्धेची

■ पान ४ वर

## संगमनेरमध्ये १२० किलो गोमांस जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने संगमनेर शहरातील कत्तलखान्यावर कारवाई करून १२० किलो गोमांस जप्त केले. याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलसीबीचे पथक दिनांक २९ रोजी पहाटे संगमनेर शहरामध्ये पेट्रोलिंग करीत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, मोहमंद नदीम कुरेशी (रा. मोगलपुरा संगमनेर) हा साथीदारासह घराच्या शेजारी खोलीमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करत आहे. पथकाने तात्काळ जाऊन खात्री केली असता खोलीमध्ये एका ठिकाणी गोवंशीय जनावरांची कत्तल केल्याचे दिसून आले. पथकाने छापा टाकून मजरेहक मोहमंदनदीस कुरेशी (वय-२८ वर्षे रा. मोगलपुरा, खाटीक गल्ली, संगमनेर) याला ताब्यात घेतले. या ठिकाणाहून ३६ हजार रुपये किमतीचे १२० किलो गोमांस व कत्तलीचे साहित्य असा ३७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

■ पान ४ वर

प्रलंबित बिलांवरून ठेकेदार आक्रमक

## १ मेपासून वीज देखभाल कामे बंद करण्याचा इशारा

### महावितरणच्या कारभारावर टीका; उन्हाळ्यात ग्राहकांवर परिणाम होण्याची भीती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभागाने प्रलंबित बिलांचा प्रश्न व महावितरणच्या मनमानी कारभाराविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, १ मे २०२६ पासून , व संदर्भातील सर्व व देखभाल कामे बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास हा निर्णय अमलात आणण्यात येणार असल्याचे असोसिएशनकडून स्पष्ट करण्यात आले.

असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील अनेक महिन्यांपासून विविध कामांची बिल रक्कम प्रलंबित आहे. वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले असून,




कामकाज सुरळीत ठेवणे कठीण झाले आहे.

दरम्यान, महावितरणकडून “ ” पद्धत कोणतीही स्पष्ट कार्यपद्धती (), प्रशिक्षण किंवा पूर्वसूचना न देता लागू करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या नव्या प्रणालीमध्ये कामांचे वाटप, / प्रक्रिया, बिलिंग, पेमेंट सायकल, जबाबदाऱ्या तसेच सुरक्षा नियमांविषयी कोणतीही स्पष्टता नसल्याने ठेकेदारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण आहे.

**वीज पुरवठ्यावर परिणामाची शक्यता**

१ मेपासून देखभाल कामे बंद राहिल्यास जिल्ह्यातील वीज पुरवठा व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने वीज पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो.

**ग्राहकांना बसू शकतो फटका**

लाईनमध्ये बिघाड झाल्यास दुरुस्तीकरिता अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध नसेल, तर वीज पुरवठा सुरळीत होण्यास विलंब होऊ शकतो. परिणामी, वीज ग्राहकांचा रोष महावितरणला सहन करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर १ मेपूर्वीच प्रलंबित बिलांचा प्रश्न निकाली काढून स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा, संभाव्य आंदोलनामुळे वीज व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## फुंदेटाकळी ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडाला १ कोटी ६१ लाख रुपये देणगी

### करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी । सहकार्य करण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा



ओघ सुरु झाला आहे. ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे फुंदेटाकळी (ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर ) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या संपूर्ण आकडेवारीची एकूण गोळाबेरीज ही १ कोटी ६१ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### घोसपुरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचे आयोजन



अहिल्यानगर - घोसपुरी ग्रामस्थांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, संविधानकर्ते युवा प्रतिष्ठान यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विविध वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'बुद्धवंदना'ने होणार आहे. सकाळी १० ते ११ या वेळेत धम्मदेशना, धम्मपूजन, ध्वजारोहण तसेच धार्मिक व सामाजिक विषयांवर मान्यवरांचे मनोगत होणार आहे. यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. सायंकाळी ८ ते ९ या वेळेत 'समाज प्रबोधन विचारमंथन' या कार्यक्रमांतर्गत प्रख्यात वक्ते मा. श्री. शिवव्याख्याते अभय गुलाबराव जावळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रात्री ९ वाजता सर्वांसाठी सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १० वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका कडुबाई खरात व त्यांच्या टीमकडून भीम गीतांचा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे, ज्यामुळे जयंती महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. या कार्यक्रमास घोसपुरी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, संविधानकर्ते युवा प्रतिष्ठान तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### देशात लोकशाही गुंडाळून भोंदूशाही आणली जात आहे - अ‍ॅड. गवळी

अहिल्यानगर- समाजात धर्माच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या भावनिक वातावरणाचा गैरफायदा घेत सर्वसामान्यांना दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करत, या प्रवृत्तीविरोधात जनजागृती करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने 'नॉन जेनेटिक इनफॉरमेशन' या संकल्पनेवर आधारित अभियान सुरू करण्यात आले आहे. तर देशात लोकशाही गुंडाळून भोंदूशाही आणली जात असल्याचा आरोप करुन, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान सहन केला जाणार नसल्याचा इशारा अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी संघटनेच्या वतीने दिला आहे. या अभियानाच्या माध्यमातून धर्म आणि अंधश्रद्धा यांमधील स्पष्ट फरक नागरिकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. "समजा, तपासा आणि सुधार करा!" ही घोषणा देत नागरिकांनी कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारण्याऐवजी तिचा विचारपूर्वक अभ्यास करावा, असा संदेश देण्यात आला आहे. अ‍ॅड. गवळी यांनी सांगितले की, देशाची वाटचाल वैज्ञानिक दृष्टिकोनाऐवजी अंधश्रद्धा आणि भावनिकतेकडे होत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. विज्ञानाधारित विचारसरणी रुजवण्यासाठी आणि समाजात विवेक जागृत करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, "नॉन जेनेटिक इनफॉरमेशन" या संकल्पनेद्वारे मानवी विचारसरणी आणि वर्तनावर प्रभाव टाकण्याचे विविध मार्ग तयार झाले आहेत. गेल्या काही शतकांत धार्मिक आणि सामाजिक संकल्पना या केवळ श्रद्धेपुरत्या मर्यादित न राहता, काही ठिकाणी लोकांच्या भावना नियंत्रित करण्याचे साधन बनल्या आहेत. भीती, ओळख (जात, धर्म) आणि स्वार्थ यांच्या आधारे समाजात भावनिक नियंत्रणाचे जाळे निर्माण होते. त्यामुळे लोक स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी ठरवून दिलेल्या चौकटीत अडकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.इतिहासाच्या संदर्भातही त्यांनी चिंता व्यक्त केली.

---

**नेवासा नगरपंचायत वाद: मुख्याधिकाऱ्यांच्या तक्रारीत फिल्मी ट्विस्ट**

# गोळीबार की राजकीय बनाव? नेवासकरांचा सवाल

## जिल्हाधिकाऱ्यांकडे एक आणि पोलिसात भलतीच तक्रार फराटेंच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे. मुख्याधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या फिर्यादीत गोळीबाराचा उल्लेख केल्याने खळबळ उडाली असली, तरी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेला मूळ अर्ज, पोलिसांतील फिर्याद आणि प्रत्यक्ष घटनाक्रम यातील विसंगतीमुळे आता पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर आणि मुख्याधिकाऱ्यांच्या हेतूवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**तक्रारीतील ती मोठी तफावत: धमकी की गोळीबार?**

मुख्याधिकाऱ्यांनी सुरुवातीला जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या अर्जात केवळ संशयित संजय सुखदान यांनी *शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिली असा उल्लेख केला होता. मात्र, तोफखाना पोलीस ठाण्यात (अहिल्यानगर) फिर्याद दाखल करताना या घटनेला फिल्मी वळण मिळाले. सुखदान यांनी रिव्हॉल्व्हरमधून दोनदा गोळी झाडण्याचा प्रयत्न केला, एक गोळी हुकली आणि दुसऱ्यांदा ट्रिगर अडकला, असा खळबळजनक दावा फराटे यांनी फिर्यादीत केला आहे. या विसंगतीमुळे "पत्रात गोळीबाराचा उल्लेख का नाही?"आणि "फक्त संरक्षणासाठी वाढीव कलमे लावली गेली का?" अशी चर्चा आता तालुक्यात रंगली आहे.




**पोलीस निरीक्षकांची बदली ? नेवासकरांमध्ये शंका**

मुख्याधिकाऱ्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची तडकाफडकी नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली. मात्र, नेवासा व्यापारी असोसिएशन आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या मते, जो गुन्हा घडलाच नाही, त्या दबावापोटी एका प्रामाणिक अधिकाऱ्याचा बळी दिला गेला आहे. नेवासकर विचारत आहेत की, पोलीस संरक्षणात असताना गोळीबार झालाच कुठे? राजकीय नेत्यांच्या मनधरणीसाठी पोलीस प्रशासनावर दबाव आणला जात आहे का?

**नेवासा शहर कडकडीत बंद; व्यापारी आणि नागरिकांचा मोर्चा**

मुख्याधिकाऱ्यांचा दावा खोटा असल्याचे सांगत नेवासा व्यापारी असोसिएशनने शहर कडकडीत बंद ठेवून पोलीस ठाण्यावर मोर्चा नेला. "खोलेश्वर मंदिर परिसरात गोळीबाराची कोणतीही घटना घडली नाही. सुखदान यांनी मुख्याधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणल्याने त्यांना अडकवण्यासाठी हा बनाव रचला आहे," असा आरोप व्यापारी असोसिएशनचे कुणाल मांडण यांनी केला आहे.

प्रशासकीय पेच: उपस्थित होणारे कळीचे प्रश्न

वेळ का लागला?: क्लास वन दर्जाच्या अधिकाऱ्याला गुन्हा दाखल करायला ८ दिवस का लागतात?

बदलीचे राजकारण: पोलीस निरीक्षक पाटील यांची बदली नगरपंचायतीतील वादाची किनार धरून तर झाली नाही ना?

**तपास आता तांत्रिक पुराव्यांवर**

सध्या या गुन्ह्याचा तपास सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सागर ढिकले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पोलीस विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा तपास पूर्णतः सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांवर आधारित असेल. सत्य लवकरच समोर येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून दिले जात आहे.

**संतांची भूमी बदनाम!**

राजकारण आणि अधिकारी यांच्यातील या कलगीतुऱ्यामुळे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन भूमीची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत सामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे. "विकास कधी साधणार?" हा प्रश्न आता नेवासा शहरासाठी अनुत्तरीतच आहे.

'न्याय निवाडा करताना शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एका निष्पाप व्यक्तीला शिक्षा होता कामा नये. जो गुन्हा घडलाच नाही, त्याचा बाऊ करून शहराची प्रतिमा डागाळली जात आहे.' नेवासकर नागरिक

---

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक; १८ वर्षीय तरुणी ठार, वडील गंभीर जखमी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** चित्तेपींपळगाव येथील उड्डाणपुलाजवळ शनिवारी (दि. २५) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील १८ वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे वडील गंभीर जखमी झाले आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मृत तरुणीचे नाव प्रतीक्षा गणेश ढगे (वय १८, रा. खोडेगाव, ता. छत्रपती संभाजीनगर) असे असून, जखमी वडिलांचे नाव गणेश रस्तुम ढगे आहे. प्रतीक्षा ही सीईटी परीक्षेसाठी वडिलांसोबत दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगरकडे जात होती. मात्र, परीक्षेपूर्वीच काळाने तिच्यावर झडप घातली. घटनेनंतर जखमी वडिलांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

---

## श्रद्धा सबुरीच्या पावन भूमीत रंगला.. तो भाव भक्तीचा भुकेला अनोखा कथाकथन प्रयोग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २८ वे राष्ट्रसंत गाडगे महाराज मराठी साहित्य संमेलन शिर्डी येथे नुकतेच संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक राजेंद्र फंड विराजमान होते. स्वागताध्यक्ष आचार्य डॉ. शंकर अंदाणी , प्रमुख पाहुण्या सुमन देसाई, पुरस्कार वितरण अध्यक्ष माया नवथर, आयोजक विलास पाटील कोल्हापूर हे मान्यवर होते. साहित्य संमेलनात व्याख्यान, कथाकथन, कवी संमेलन, राष्ट्रसंत गाडगे महाराज पुरस्कार, इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले.

साईबाबांच्या श्रद्धा अन् सबुरीच्या पावन भूमीत, संमेलनमध्ये



कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी तो भावभक्तीचा भुकेला ही धार्मिक कथा सादर करण्यात आली.

संसारात प्रपंच करता,करता वसुधा आपलं गुरुमंत्र सदोदित ओठांमध्ये म्हणत राहते. परमात्मा पांडुरंगाची पंढरपूरकडे जाणारी दिंडी, आपल्या घरी येणार,याचे तिला अप्रूप होते. घरी येणाऱ्या संतांच्या, वारकऱ्यांच्या स्वागतासाठी तिने तयारी केलेली. ऐनवेळी तिने केलेला चिवडा तिच्या जाऊबाईनी नाकारला. तेव्हा तिला सासूबाईची आठवण झाली. १८ पुराणे आणि शेकडो पोथ्या श्रवण केलेली सासू तिला म्हणत असे देवाला आपलेसे करण्यासाठी दोन हाताचा नमस्कार आणि दोन फुले मनोभावे वाहिली ,की ती देवाला पावतात. माणसांची श्रद्धा डोळस असायला हवी. बेगडी, नकली श्रद्धा उपयोगाची नाही. शबरीची उष्टी बोरे श्रीरामाने खाल्ली. गरीब सुदाम्याचे चिमूटभर पोहे देखील श्री कृष्णाने मोठ्या आवडीने खाल्ले. हा भाव भक्तीचा महिमा बाळासाहेब देशमुख यांनी आपल्या कथेद्वारे मांडला. त्यावेळी सर्व सभागृह कथाकथनाने मंत्रमुग्ध झालेले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक श्री रंगनाथ वाडेकर यांनी केले. महाराष्ट्राच्या विविध भागातून साहित्यिक मोठ्या संख्येने संमेलनात हजर होते.

---

## बीबीए, बीसीए सीईटी प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील आयएमएस () कॅम्पसमध्ये बीबीए / बीसीए सीईटी २०२६ साठी आयोजित करण्यात आलेला मोफत प्रशिक्षण (क्रॅश) कोर्स यशस्वीरित्या पूर्ण झाला असून, या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सुमारे एक महिन्याच्या कालावधीत चाललेल्या या प्रशिक्षण वर्गात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दररोज नियोजित वेळेनुसार अनुभवी प्राध्यापकांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या कोर्सद्वारे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेले महत्त्वाचे विषय, प्रश्नपत्रिका सराव, वेळेचे व्यवस्थापन आणि परीक्षेची रणनीती यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

कोर्सच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांसाठी सराव चाचण्या ( ) घेण्यात आल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक वाढला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत, परीक्षेसाठी आपण अधिक तयार झाल्याची भावना व्यक्त केली.

या उपक्रमासाठी आयएमएसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता तसेच उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना आगामी परीक्षेसाठी शुभेच्छा देत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळविण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

प्रवेश प्रक्रियेबाबत तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी बीसीए प्रवेशासाठी डॉ. सय्यद (९८२३१००७५६) तसेच बीबीए प्रवेशासाठी डॉ. भावसार (९९६०४५९६४७) यांच्याशी थेट संपर्क साधावा.


---

## वॅक्सिन किंग सायरस पूनावाला यांना ध्यानधारणेची पुस्तके देण्यात आली भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संस्थापक आणि जगातील सर्वात मोठे लस उत्पादक उद्योगपती 'वॅक्सिन किंग म्हणून ओळखले जाणारे सायरस पूनावाला यांची जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालीका व सुप्रसिद्ध प्रेरक वक्ता ब्रह्माकुमारी त्रिवेणी दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ दीपक हरके यांनी पुण्यात भेट घेऊन संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व त्यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी बी के आशा दीदी उपस्थित होत्या.

सायरस पूनावाला यांना भारत सरकारकडून २००५ मध्ये पद्मश्री आणि २०२२ मध्ये पद्मभूषण पुरस्कार मिळाला



आहे. सायरस पूनावाला हे भारतातील सर्वात श्रीमंत अब्जाधीशांच्या यादीत प्रमुख स्थानावर आहेत.

सायरस पूनावाला यांनी पुण्यात स्थापन केलेल्या सीरम इन्स्टिट्यूटद्वारे स्वस्त दरात लसी उपलब्ध करून आरोग्य क्षेत्रात मोठी क्रांती केली आहे सायरस पूनावाला यांनी एप्रिल २०२६ मध्ये १६७ कोटी रुपयांना राजा रवी वर्मा यांचे पेंटिंग खरेदी केल्यामुळे ते पुन्हा चर्चेत आले होते.

ध्यानधारणे बद्दल माहिती देताना बी के डॉ दीपक हरके यांनी सांगितले की , राजयोग ध्यान हा ध्यानाचा एक प्रकार आहे जो सर्व पार्श्वभूमीच्या लोकांसाठी प्रवेशयोग्य आहे. हे विधी किंवा मंत्रांशिवाय एक ध्यान आहे आणि कधीही कुठेही सराव करता येतो. राजयोग ध्यानाचा सराव उघड्या डोळ्यांनी केला जातो, ज्यामुळे ध्यानाची ही पद्धत बहुमुखी, सोपी आणि सराव करण्यास सोपी बनते. ध्यान ही त्या ठिकाणी असण्याची अवस्था आहे जी दररोजच्या चेतनेच्या पलीकडे असते, जिथे आध्यात्मिक सशक्तीकरण सुरू होते. आध्यात्मिक जागरूकता आपल्याला नकारात्मक आणि व्यर्थ विचारांपेक्षा चांगले आणि सकारात्मक विचार निवडण्याची शक्ती देते. आम्ही परिस्थितींवर प्रतिक्रिया देण्याऐवजी त्यांना प्रतिसाद देऊ लागतो. आपण सुसंवादाने जगू लागतो, आपण अधिक चांगले आणि आनंदी, निरोगी संबंध निर्माण करतो आणि आपले जीवन सर्वात सकारात्मक मार्गाने बदलतो.

---

**केंद्रीय विद्यालय ५५ व्या प्रादेशिक क्रीडा संमेलन स्पर्धेत**

## स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्रीय विद्यालय संघटन, मुंबई प्रदेशतर्फे ५५व्या प्रादेशिक टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धा २२ एप्रिल रोजी , खडकवासला, पुणे येथे पार पडल्या.

या स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीच्या मुलांनी उत्तम कामगिरी करत १ सुवर्ण, १ रजत आणि १ रौप्य पदके पटकावली.

१७ वर्ष वयोगटात संघ प्रकारात वेदांत शितोळे आणि निधीश भंडारे यांच्या संघाने सुवर्ण पदक जिंकले. तसेच एकेरी मुलाच्या गटात वेदांत शितोळे याने रजत पदक व निधीश भंडारे याने कांस्य पदक जिंकले. सर्व विजयी खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत अहिल्यानगर, मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, ठाणे आणि नाशिक या जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत हर्ष फुंदे याने उत्कृष्ट खेळ केला. स्मॅश अकॅडमीच्या सर्व खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून प्रेक्षकांची मने जिंकली. या सर्व खेळाडूंचे टेबल टेनिसप्रेमींनी अभिनंदन केले.

---

## आनंदऋषीजी नेत्रालयात ३ मे रोजी मोफत तिरळेपणा उपचार व बाल नेत्रतपासणी शिबिर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लहान मुलांमध्ये वाढत्या डोळ्यांच्या समस्या लक्षात घेऊन आनंदऋषीजी नेत्रालय येथे रविवार दि. ३ मे २०२६ रोजी मोफत तिरळेपणा उपचार व बाल नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आनंदऋषीजी नेत्रालय, सक्कर चौक, अहिल्यानगर येथे होणार आहे. संथारा व्रतधारी श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रूणवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अजय रूणवाल, सतिश रूणवाल, मंगला रूणवाल परिवार (विजापूर/ पुणे) शिबिराचे आयोजक आहेत.

आजच्या काळात मोबाईल, टॅब व टीव्हीचा वाढलेला वापर (स्क्रीन टाईम) आणि कमी झालेला मैदानी खेळ यामुळे मुलांमध्ये मायोपिया (जवळचा नंबर वाढणे), डोळे दुखणे, पाणी येणे, डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, या समस्या वेळेत ओळखल्या नाहीत तर मुलांच्या शिक्षणावर आणि विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लहान वयातच डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे.



या शिबिरात प्रख्यात बाल नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. निरंजन पेहेरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी व उपचार करणार आहेत. डॉ. पेहेरे हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, गेल्या १६ वर्षांपासून एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट येथे कार्यरत आहेत. त्यांनी आफ्रिका, युरोप व अमेरिका येथेही काम केले असून तिरळेपणा उपचारात विशेष प्रावीण्य मिळवले आहे. त्यांनी आतापर्यंत शेकडो रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

नेत्रालयात रेटिना, कॉर्निया, ग्लुकोमा व बाल नेत्ररोग अशा सर्व सुपर-स्पेशालिटी सेवा उपलब्ध आहेत. संस्थेने आतापर्यंत १.२५ लाखांहून अधिक नेत्रशस्त्रक्रिया केल्या असून दररोज ८० ते १०० शस्त्रक्रिया केल्या जातात. येथे ५ अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, वेब कॅमेरा मॉनिटरिंग, तसेच पूर्णवेळ अ‍ॅनेस्थेटिस्ट व फिजिशियन सुविधा उपलब्ध आहेत.

याशिवाय २० पेक्षा अधिक व्हिजन सेंटर्स, टेलिमेडिसिन सुविधा, अत्याधुनिक तारकपूर सेंटर, कौन्सिलिंग टीम, ऑप्टिकल विभाग व रुग्णांसाठी अन्न व्यवस्था उपलब्ध आहे. पात्र रुग्णांना आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अंतर्गत मोफत उपचार दिले जाणार आहेत. तज्ज्ञांनी पालकांना आवाहन केले आहे की, मुलांचा स्क्रीन टाइम मर्यादित ठेवावा, बाहेर खेळण्यास प्रोत्साहन द्यावे आणि वर्षातून किमान एकदा डोळ्यांची तपासणी करून घ्यावी.या मोफत शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### आल्हाट यांना पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार प्रदान



अहिल्यानगर - येथील कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना भारत सरकारच्या नीती आयोग संलग्नित डॉ. मणिमाई देसाई प्रतिष्ठान व आरोग्य सेवा संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना त्यांच्या बहुआयामी योगदानाबद्दल देण्यात आला आहे. पुणे येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खादी व ग्रामोद्योग मंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते आल्हाट यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले की, ''साहित्य, समाजसेवा, पत्रकारिता तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सरोज आल्हाट यांनी अनेक वर्षे सातत्याने केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील या पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याचे स्पष्ट केले. सरोज आल्हाट या केवळ कवयित्री म्हणूनच नव्हे, तर सामाजिक प्रश्नांवर लेखन व जनजागृती करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणूनही ओळखल्या जातात. रुग्णसेवा देखील त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय असून त्यांनी महिलांविषयक, शिक्षण आणि समाजजागृती विषयांवर प्रभावी काम केले या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यापूर्वीही त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना सदरचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### सावेडीत 'मदूरा स्टोअर्स'ची नवी शाखा; उद्घाटनानिमित्त आकर्षक सूट ऑफर

अहिल्यानगर - कपड्यांच्या व्यवसायातील विश्वासार्ह व नावाजलेले ब्रँड 'मदूरा स्टोअर्स'ने सावेडी परिसरात आपल्या नवीन शाखेचे उद्घाटन करून ग्राहकांना आणखी एक सोयीस्कर पर्याय उपलब्ध करून दिला आहे. दीर्घकाळापासून जपलेले ग्राहकांशी नाते अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने ही शाखा सुरू करण्यात आली आहे. सावेडीतील प्रोफेसर चौक, गुलमोहर रोड कॉर्नर, राजस गिफ्टच्या खाली व पटवर्धन स्मारकाच्या पुढे या मध्यवर्ती ठिकाणी ही शाखा सुरू झाली असून, ३० एप्रिल पासून ग्राहकांसाठी खुली करण्यात आली आहे. १९४८ साली स्थापन झालेल्या 'मदूरा स्टोअर्स'ने अनेक दशकांपासून उत्कृष्ट सेवा व वाजवी दरामुळे ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. या व्यवसायाची पायाभरणी मुलजी नरसी व्होरा (बाबुभाई) व नलिन नरसी व्होरा (नानजीभाई) यांनी एम. जी. रोडवरील एका छोट्याशा गाळ्यातून केली होती. त्यानंतर १९७७ मध्ये श्री किरण मुलजी व्होरा यांनी व्यवसायाचा विस्तार करत बहुमजली दुकान उभारले तसेच नवजात बालकांसाठी विशेष दुकानाची सुरुवात केली. सध्या 'मदूरा स्टोअर्स' मुलं, मुली व पुरुषांसाठी रेडिमेड कपड्यांमध्ये उत्कृष्ट शिलाई व फिटिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसेच नामांकित ब्रँड्सच्या होजिअरी व अंतर्वस्त्रांमध्येही या स्टोअरने विशेष ओळख निर्माण केली आहे. पावसाळी, स्विमिंग व हिवाळी कपड्यांचीही येथे उपलब्धता असून, अनेक वर्षांपासून ग्राहकांची ही पहिली पसंती राहिली आहे. नव्या पिढीतील जश किरण व्होरा व जीत किरण व्होरा यांनी व्यवसायात प्रवेश करून प्रीमियम दर्जाच्या शाळा, कॉलेज व कॉर्पोरेट युनिफॉर्मची सुविधा सुरू केली आहे. सावेडी येथील नव्या शाखेमुळे परिसरातील ग्राहकांना शालेय युनिफॉर्म, होजिअरी, रेडिमेड कपडे, स्पोर्ट्सवेअर, वुलन व उन्हाळी कपडे एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. या नव्या शाखेमुळे 'मदूरा स्टोअर्स'च्या यशस्वी वाटचालीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला असून, गुणवत्ता व ग्राहक समाधानाची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा संस्थेचा निर्धार असून सावेडीकरांनी या दुकानावर भेट घ्यावी.

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे हुंडेकरी परिवाराच्या वतीने स्वागत

### डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते हाजी करीमशेठ हुंडेकरी यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरात 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' चे उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले. या यात्रेचे हुंडेकरी परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यात्रेसाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या हुंडेकरी परिवाराने पुन्हा एकदा आपली सेवाभावी परंपरा अधोरेखित केली. यात्रेच्या सोयीसाठी 'हुंडेकरी लॉन' उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते हाजी करीमशेठ हुंडेकरी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला उपमहापौर धनंजय जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हुंडेकरी परिवाराच्या वतीने दरवर्षी नाशिकहून सायकलवरून येणाऱ्या आषाढी वारी यात्रेचेही स्वागत करुन संपूर्ण व्यवस्था पाहिली जाते. या जलयात्रेच्या निमित्ताने शहरात धार्मिक एकात्मता आणि सामाजिक सहकार्याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, '''गोदा ते नर्मदा' ही जलयात्रा शहरांच्या जलसमृध्दीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारी ही यात्रा आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजासाठी कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हुंडेकरी परिवाराने यात्रेसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

हाजी करीमशेठ हुंडेकरी म्हणाले की, ''आमच्या परिवाराला सामाजिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळते, हे आमचे भाग्य आहे. यात्रेकरूंना सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची जबाबदारी समजून आम्ही काम करतो. आषाढी वारी असो किंवा जलयात्रा प्रत्येक उपक्रमात आम्ही भाविकांची सेवा करण्याचा प्रयत्न करतो. पुढेही अशी सेवा सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प असल्याचे ते म्हणाले.

## सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्तीच यशाची गुरुकिल्ली - अमित रत्नपारखी

### डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत रिदम २के२६ पारितोषिक वितरण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित 'रिदम २के२६' या वार्षिक कार्यक्रमातील पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून ॲडव्होकेट श्री. वसंतराव कापरे उपस्थित होते, तर मुख्य अतिथी म्हणून श्री.अमित रत्नपारखी (मेकॅनिकल, बॅच १९९४) यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

श्री.अमित रत्नपारखी सध्या स्टरलाइट टेक्नॉलॉजिस लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथे ग्लोबल प्रोक्योरमेंट हेड म्हणून कार्यरत असून त्यांना ३० वर्षांहून अधिक औद्योगिक अनुभव आहे. त्यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

आपल्या भाषणात श्री. अमित रत्नपारखी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''यश मिळवण्यासाठी सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्ती अत्यंत महत्त्वाची आहे. अभियांत्रिकी शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष जीवनात त्याचा उपयोग करून नवकल्पना करण्यावर भर द्यावा.'' त्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी कौशल्यविकास तांत्रिक ज्ञान आणि संवाद कौशल्य यांचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशाला घाबरू नका, तर त्यातून शिकून पुढे जाण्याचा सल्ला दिला. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली.

कार्यक्रमास मान्यवर पाहुणे म्हणून श्री. प्रवीण म्हस्के आणि श्री. संदीप चंगेडे यांची उपस्थिती लाभली. श्री. प्रवीण म्हस्के (बॅच २००१) हे मध्ये प्रिन्सिपल डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत असून त्यांना २४ वर्षांचा अनुभव आहे. ते डेटा सायन्स आणि मशीन लर्निंग क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. श्री.संदीप चंगेडे (बॅच १९९३) हे सिस्कॉन कॅम्पुटर सिस्टीम, पुणे यांच्याशी संलग्न यशस्वी उद्योजक आहेत.


या प्रसंगी डॉ. पी.एम. गायकवाड, सेक्रेटरी जनरल विखे पाटील फाउंडेशन चे प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.आर.आर. नवथर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यात अकॅडमिक प्राइजेस, स्पोर्ट्स प्राइजेस,आर्ट एक्झिबिशन, पद्मश्री करंडक इत्यादींचा समावेश होता. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्नेहसंमेलन समन्वयक प्रा. सुनील मांढरे तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. संदीप उदावंत, प्रा. पंकज औताडे, डॉ. कानिफ मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले. हा पारितोषिक वितरण सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून संस्थेच्या गुणवत्तापूर्ण परंपरेचे दर्शन घडवणारा ठरला.

## खळबळजनक! त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या सचिवांचा स्वत:ला जाळून घेत आत्महत्येचा प्रयत्न; नेवासा हादरले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा–** नेवासा तालुक्यातील नामांकित त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे सचिव *मनीष घाडगे* यांनी मंगळवारी आपल्या कार्यालयात स्वतः ला जाळून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण प्रकारामुळे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात आणि जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, मनीष घाडगे हे नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील आपल्या दालनात असताना त्यांनी अचानक टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी स्वतःवर ज्वालाग्राही पदार्थ ओतून पेटवून घेतले. कार्यालयातून धूर आणि ओरडण्याचा आवाज आल्याने कर्मचाऱ्यांनी त्या दिशेने धाव घेतली. गंभीर भाजलेल्या अवस्थेत त्यांना तातडीने उपचारासाठी नगर येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले असून, सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

**घटनेनंतर परिसरात सन्नाटा**

संस्थेचे संस्थापक साहेबराव घाडगे यांच्या निधनानंतर संस्थेची संपूर्ण धुरा मनीष घाडगे सांभाळत होते. मात्र, त्यांनी अचानक स्वतःला पेटवून घेतल्याने सर्वत्र तर्कवितर्कांना उधाण आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा सुरू केला आहे. संस्थेच्या आवारात सध्या तणावपूर्ण शांतता असून प्रवेश मर्यादित करण्यात आला आहे.

**कारणांचा शोध सुरू**

हा प्रकार नेमका कौटुंबिक वादातून घडला की संस्थेतील अंतर्गत तणावामुळे, याचे अधिकृत कारण अद्याप समोर आलेले नाही. एका प्रतिष्ठित संस्थेच्या तरुण सचिवांनी अशा प्रकारे स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केल्याने शिक्षण क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलीस या प्रकरणाचा तांत्रिक दृष्टीने तपास करत असून, घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. मनीष घाडगे यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी त्यांचे हितचिंतक प्रार्थना करत आहेत.

## मातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ ९९ 'ग्रामगीता' अर्पण

### ग्रामविकासासाठी पारायणाचे आवाहन देवगड पूज्य बाबाजींचा संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री क्षेत्र देवगड नेवासा येथे पूज्य बाबाजी यांच्या मातोश्रींच्या ९९व्या वर्षी ब्रह्मलीन झाल्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ घोडेगाव येथील १९८३ बॅचच्या वतीने ९९ 'ग्रामगीता' अर्पण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमासोबतच परमहंस संत शंकर महाराज यांच्या कृपेने ९९ 'ध्यानामृत ज्ञानेश्वरी' प्रसाद ज्ञानामृत, 'अमृतवाणी' तसेच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ध्यान-प्रार्थनेच्या ९९९ पुस्तिकांचे वितरण सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती निवृत्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी दिली.

या उपक्रमातून ग्रामविकास आणि आध्यात्मिक उन्नतीचा दुहेरी संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे. यावेळी पूज्य बाबाजी यांनी मार्गदर्शन करताना देव, देश आणि धर्म यांप्रती प्रत्येक भारतीयाने निष्ठा ठेवावी, तसेच भारतीय संस्कृतीतील श्रेष्ठ परंपरा कृतीतून जगासमोर नम्रतेने मांडाव्यात, असे आवाहन केले.

''कोणी आक्रमकतेने पुढे आले तरी आपण संयम आणि नम्रतेने परिस्थिती हाताळावी,'' असा संस्कारमूल्यांचा संदेश देताना त्यांनी आपल्या मातोश्रींकडून लाभलेल्या संस्कारांची आठवणही करून दिली.

भारतीय पंचांगानुसार येणाऱ्या अधिक महिन्याच्या पार्श्वभूमीवर गावोगावी धार्मिक ग्रंथांचे पारायण करण्याची परंपरा अधिक दृढ करण्याचे आवाहनही त्यांनी केले. 'ग्रामगीता'सह विविध संत साहित्याचे पारायण करून समाजाच्या शाश्वत विकासासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमासाठी आवश्यक 'ग्रामगीता' ग्रंथ श्री क्षेत्र देवगड नेवासा येथील देवस्थानामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून इच्छुकांनी मागणी नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



ग्रामगीतेच्या तत्वांनुसार प्रत्येक गाव स्वयंपूर्ण, स्वयंशासित आणि संयमी बनणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित करताना त्यांनी आई-वडिलांची सेवा, गोपालन, नैसर्गिक शेती, प्रक्रिया उद्योग यांना चालना देत शासकीय योजनांची प्रभावी सांगड घालण्याचेही आवाहन केले.

या उपक्रमातून ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा–प्रा.एकनाथ होले

### नेप्ती विद्यालयात मोफत दहावीनंतरच्या करिअर मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री. स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात मोफत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ''दहावीनंतर पुढे काय?'' या विषयावर करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बोर्ड परीक्षा होऊन जवळपास एक महिना उलटला असून निकाल लवकरच जाहीर होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुढील वाटचालीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

कार्यक्रमात प्रा. एकनाथ होले यांनी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक पर्यायांची सविस्तर माहिती देत योग्य निर्णय घेण्याचे महत्त्व पटवून दिले. दहावीनंतर अकरावी सायन्स, कॉमर्स, आर्ट्स, आयटीआय, डिप्लोमा तसेच विविध कॉम्प्युटर कोर्सेस असे अनेक पर्याय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीनिवडी, क्षमता आणि भविष्यातील ध्येय लक्षात घेऊन शाखा निवडावी. यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.




ते पुढे म्हणाले की, सायन्स शाखा निवडल्यास इंजिनिअर, डॉक्टर, संशोधक आणि तज्ज्ञ शास्त्रज्ञ होण्याच्या संधी उपलब्ध होतात, तर कॉमर्स शाखेतून सीए, सीएस यांसारख्या व्यावसायिक क्षेत्रात करिअर घडवता येते, असेही त्यांनी नमूद केले. तसेच कला शाखेतून शिक्षक, प्राध्यापक, वकील तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत जाण्याचे मार्ग खुले होतात. ''योग्य दिशा निवडल्यासच यश निश्चित आहे. दहावी हा आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून या टप्प्यानंतर घेतलेला निर्णय पुढील करिअर घडवतो. त्यामुळे केवळ इतरांच्या सांगण्यावरून नव्हे, तर स्वतः च्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार निर्णय घ्या. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध आहे.सायन्स, कॉमर्स किंवा आर्ट्स कोणतीही शाखा कमी किंवा जास्त नाही. प्रत्येक शाखेत प्रगती करण्यासाठी मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असते. आजच्या काळात कौशल्याला जास्त महत्त्व असून, विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करावीत, असेही त्यांनी नमूद केले.

स्पर्धा परीक्षा जसे की एमपीएससी, यूपीएससी, स्टाफ सिलेक्शन यांसारख्या परीक्षांद्वारे प्रशासनात जाण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विशेषतः कला शाखेतील विद्यार्थ्यांना या क्षेत्रात उज्वल भविष्य घडवण्याची संधी आहे,'' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापक गोविंद कदम व अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक महेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, प्राध्यापक एकनाथ होले , प्रा. गोविंद कदम, प्रा. गोरक्ष कांडेकर ,नानासाहेब घोडके ,राजेंद्र झावरे, बाबासाहेब भोर, गोरक्ष कोतकर ,शिवाजी जाधव ,सविता कोरडे, श्रद्धा भांड, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इयत्ता दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिल्हा न्यायालया समोर सुरु असलेले काते कुटुंबाचे उपोषण मागे

## ॲड. सुरेश लगड यांनी सोडविले उपोषण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा न्यायालयाच्या सेशन कोर्टाने दिलेल्या निकालाविरोधात अन्याय झाल्याचा आरोप करत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव काते यांनी आपल्या कुटुंबीयांसह जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण केले. यावेळी विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांनी उच्च न्यायालयात दाद मागून न्याय मिळवणार असल्याचे स्पष्ट करुन काते परिवाराचे उपोषण लिंबू पाणी देऊन सोडविले. यावेळी ॲड आनंद सुर्यवंशी, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांच्यासह उपोषणकर्ते सुशिला काते, अनिता जाधव, रेखा भोगले, श्रद्धा काते, आराधना भोगले, अंकिता भोगले, राणी जाधव, सिताबाई रोकडे आदी उपस्थित होते.

काते यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ते सामाजिक कार्यकर्ते असून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ता म्हणून काम करतात. त्यांच्या मुलगा राजू साहेबराव काते याच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात ११ नोव्हेंबर २०२१ रोजी एका महिलेने भारतीय दंड विधान कलम ३७६, ४५२, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी या प्रकरणात तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ६ वे जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी १२ मार्च २०२६ रोजी राजू काते यास दोषी ठरवत १० वर्षे सक्त मजुरी व दंडाची शिक्षा सुनावली. मात्र, हा निकाल वस्तुस्थितीचा योग्य विचार न करता देण्यात आल्याचा गंभीर आरोप काते यांनी केला आहे.

काते यांच्या मते, संबंधित महिलेने सुरुवातीला रुग्णालयात उपचारादरम्यान ''अनोळखी व्यक्तीने अत्याचार केला'' असे सांगितले होते, अशी नोंद वैद्यकीय कागदपत्रांत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिने कथितरीत्या नाव बदलून राजू काते याच्यावर आरोप केला. यामुळे संपूर्ण प्रकरण संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, या प्रकरणातील डीएनए तपासणी अहवाल कायद्यानुसार ९० दिवसांत मिळणे अपेक्षित असताना तो सुमारे १४ महिन्यांनी सादर करण्यात आला. विशेष म्हणजे, दोन्ही वेळच्या डीएनए अहवालात निष्कर्ष 'निगेटिव्ह' आले असतानाही न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करून शिक्षा ठोठावली, असा आरोप काते यांनी केला आहे. या अन्यायाच्या विरोधात आणि या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीसाठी जिल्हा न्यायालयाच्या गेटसमोर कुटुंबीयांसह बेमुदत आमरण उपोषण करुन निवेदन राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.



**कापूरवाडी तलावाचा आधार....** गेल्या आठ दिवसापासून तापमानात सातत्याने वाढ होत असून कापूरवाडी तलावात सध्या ३० ते ४० टक्के पाणीसाठा असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना खूप मोठा आधार सध्या उन्हाळ्यात या तलावाचा होत आहे. (छाया – विजय मते)

# अहिल्यानगर मनपाच्या वतीने सावेडी प्रभाग समिती कार्यालयात 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्र'चे उद्घाटन

## सेवा हक्क दिनानिमित्त नागरिकांसाठी ७० ऑनलाइन सेवांचा शुभारंभ । नगरकरांना जलद, पारदर्शक व सुलभ सेवा देण्यासाठी महापालिकेचा पुढाकार





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नागरिकांना शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने सेवा हक्क दिनानिमित्त सावेडी प्रभाग समिती कार्यालय येथे 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्र'चे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना विविध सेवा आता त्यांच्या परिसरातच उपलब्ध होणार आहेत.

या सेवा केंद्राचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध सेवा पुरविल्या जातात. नागरिकांना अधिक वेगाने आणि त्यांच्या परिसरातच सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सावेडी प्रभाग समिती कार्यालयात आदर्श आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. लवकरच महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये अशाच प्रकारची सेवा सुविधा केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. नागरिकांनी या सुविधांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, लोकसेवा हक्क दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या माध्यमातून ७० ऑनलाइन सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या सेवांमध्ये जन्म-मृत्यू दाखले, मालमत्ता कर आकारणी, विवाह नोंदणी, थकबाकी नसल्याचा दाखला, नळ कनेक्शन तसेच इतर महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे. नागरिकांना कोणताही त्रास न होता त्यांची कामे तातडीने मार्गी लागावीत, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, डिजिटल प्रणालीमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून शासकीय कार्यालयांतील फेऱ्या कमी होतील. सेवा वितरणात पारदर्शकता वाढेल आणि तक्रारींमध्येही घट होईल. महापालिका प्रशासन नागरिकाभिमुख कामकाजासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपायुक्त मेहेर लहारे यांनी 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्रा'च्या विविध सुविधांची माहिती दिली. नागरिकांना ऑनलाइन अर्ज, प्रमाणपत्रे, कर भरणा, नोंदणी सेवा आणि इतर कागदपत्रांची प्रक्रिया एका ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी सेवा हक्क दिनानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देण्याची शपथ घेतली.

एकूणच, या उपक्रमामुळे अहिल्यानगर शहरातील नागरिकांना अधिक आधुनिक, जलद आणि विश्वासार्ह सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून महापालिकेच्या प्रशासनिक कार्यपद्धतीतही सकारात्मक बदल होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पैठणात वाळू माफियांचा हैदोस

# चित्रीकरण करणाऱ्या पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** शहरासह परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसाचा पर्दाफाश करण्यासाठी गेलेल्या एका पत्रकाराला थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पत्रकार गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसाचे चित्रीकरण करत असताना कथित वाळू माफियांनी त्यांना अडवले. यावेळी शिवीगाळ करत थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर रेती उपसा सुरू असून संबंधित यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

या घटनेनंतर पत्रकार सुरक्षा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ''पत्रकारांनाच अशा प्रकारे धमक्या दिल्या जात असतील, तर सामान्य नागरिकांचे संरक्षण कोण करणार?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पत्रकार संघटनांकडून होत आहे. भारतीय दंड संहितेनुसार जीवे मारण्याची धमकी, शिवीगाळ आणि कामात अडथळा आणणे यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल होऊ शकतो. पोलिस प्रशासनाने तातडीने गुन्हा नोंदवून आरोपींना अटक करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पैठणमध्ये वाळू माफियांचा वाढता दबदबा आणि प्रशासनाची कथित निष्क्रियता यामुळे परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. पत्रकारांवरील हल्ले लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर घाला असल्याने याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे मत व्यक्त होत आहे.

# न्यायालयातच पत्नी व सासूवर मारहाण; पती गजाआड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** न्यायालयाच्या आवारातच पत्नी व सासूला बेदम मारहाण केल्याप्रकरणी पतीला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी योगेश राम बोर्डे (रा. देगाव, ता. रत्नापूर) हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला वारंवार त्रास देत होता. याप्रकरणी पती-पत्नीमधील वाद न्यायालयात सुरू होता. सुनावणीसाठी पत्नी गीता बोर्डे (रा. अमरापूर बंधुडी, ता. पैठण) या आपल्या



आईसोबत न्यायालयात हजर झाल्या होत्या. दरम्यान, न्यायालयाच्या इमारतीत महिला वकिलांसोबत चर्चा सुरू असताना आरोपी तेथे आला आणि अचानक पत्नी व सासूवर हल्ला चढवला. दोघींनाही बेदम मारहाण करण्यात आली. न्यायालयात उपस्थित पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून आरोपीला ताब्यात घेतले.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, पतीच्या संशयी स्वभावामुळे सतत वाद होत असून स्वतः च्या व मुलीच्या जीवाला धोका असल्याची भीती तिला आहे. या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पुजा शिरसाट एकाच वेळी दुहेरी यश संपादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी येथील पुजा आदिनाथ शिरसाट हिने पोलीस भरतीत एकाच वेळी दुहेरी यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.नुकत्याच पार पडलेल्या पुणे शहर पोलीस भरती प्रक्रियेत पुजाने १२५ गुण मिळवत खुल्या प्रवर्गातून निवड मिळवली. त्याचबरोबर पुणे शहर पोलीस चालक भरतीमध्ये तिने १३४ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावत आणखी एक मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोचला आहे.एकाच वेळी दोन भरती प्रक्रियेत यश मिळवण्याची दुर्मीळ कामगिरी करत पुजाने आपल्या जिद्द, चिकाटी आणि परिश्रमांची प्रचिती दिली आहे. हे यश पूजाने २१ व्या वर्षी मिळवले आहे.



सध्या ती बाबुजी महाविद्यालयात बी.सी.एस. तृतीय वर्षात शिक्षण घेत असून शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी करत तिने हे यश मिळवले आहे.विशेष म्हणजे, पुजाने फार्मसीचे शिक्षण पूर्ण केले होते. त्या क्षेत्रात उज्ज्वल करिअरच्या संधी उपलब्ध असतानाही तिने पोलीस सेवेत दाखल होण्याचा निर्धार केला आणि पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले. तिच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.या यशामागे तिचे आई-वडील, चुलते तसेच शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे पुजाने सांगितले. पुजा ही पाथर्डी न्यायालयातील ॲड. बाळकृष्ण शिरसाट यांची पुतणी असून तिच्या यशाबद्दल परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पुजाच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पाथर्डी तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील गुणवंत परंपरेत आणखी एक सुवर्ण पान जोडले गेले आहे

# राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे पगार रखडले; श्रमिक महासंघाने तातडीने राज्यस्तरीय बैठक घ्यावी

## अहिल्यानगर मनपा कामगार युनियनचे महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाला निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील अनेक महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याने कर्मचारी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. दोन-दोन महिने पगार रखडत असल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह, कर्जाचे हप्ते, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाने पुढाकार घेऊन राज्यातील महानगरपालिकांना एकत्रित करत तातडीने बैठक आयोजित करावी, अशी मागणी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने केली आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाचे सचिव कॉम्रेड उदय भट यांना निवेदन देण्यात आले. याबाबत माहिती देताना युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुद्गल व सचिव आनंद वायकर यांनी सांगितले की, महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून राज्यस्तरावर सामूहिक लढा उभारण्याची गरज निर्माण झाली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या दोन महिन्यांपासून राज्यातील 'ड' वर्ग महानगरपालिकांना एल.बी.टी. अनुदान (जी. एस.टी.) वेळेवर मिळत नाही. त्यामुळे अनेक महानगरपालिका तसेच इतर काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन व पेन्शन वेळेवर अदा होत नाही. फेब्रुवारी २०२६ चे अनुदान दि. ३० मार्च २०२६ रोजी प्राप्त झाले, तर मार्च २०२६ चे अनुदान अद्यापही संबंधित महानगरपालिकांना मिळालेले नाही.

ज्या महानगरपालिकांची आर्थिक परिस्थिती सक्षम नाही, अशा ठिकाणी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन, तसेच इतर थकीत देणी देणे अत्यंत कठीण झाले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांना कर्जबाजारीपणाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महासंघाच्या वतीने पुणे येथे राज्यातील महानगरपालिका कामगार-कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बैठकीत अनुदान वितरणातील विलंब, पगार व पेन्शन प्रश्न, तसेच कर्मचाऱ्यांच्या थकीत देण्यांवर सविस्तर चर्चा व्हावी, असे निवेदनात म्हटले आहे.

तसेच मुख्यमंत्री यांना महासंघाच्या वतीने निवेदन देऊन शिष्टमंडळास चर्चेसाठी वेळ मिळवून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या-आपल्या महानगरपालिकेतील पगार, पेन्शन आणि इतर थकबाकीचा तपशील लेखी स्वरूपात सादर करावा, असे आवाहन करण्यात यावे, असेही नमूद करण्यात आले आहे.

युनियन पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जर शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर राज्यपातळीवर आंदोलन उभारण्याबाबतही बैठकीत निर्णय घेता येईल. कर्मचाऱ्यांचे प्रश्न केवळ स्थानिक पातळीवर न राहता आता राज्यव्यापी झाले असून त्यासाठी सर्व संघटनांनी एकत्र येण्याची गरज आहे.

(पान १ वरून)

### उपमहापौर धनंजय जाधव चषक जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा ३ मे रोजी

प्रवेश फी संघटनेमार्फत भरली जाणार असून राहण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना ''उपमहापौर धनंजय जाधव करंडक'' देऊन गौरविण्यात येणार आहे.

ही स्पर्धा १ जानेवारी २००७ नंतर जन्मलेल्या (१९ वर्षांखालील) खेळाडूंसाठी खुली असून सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी बुद्धिबळ पट, सोंगट्या, जेवणाचा डबा व पिण्याचे पाणी सोबत आणणे आवश्यक आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश ऑनलाइन किंवा व्हॉट्सॲपद्वारे स्वीकारले जात असून नोंदणीची अंतिम मुदत शनिवार, दि. २ मे रोजी सायंकाळी ८.०० वाजेपर्यंत आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी यशवंत बापट (९३२६०९२५०१), पारूनाथ ढोकळे (९८५०७०४२६८), मनीष जसवानी (८८५५००२३३२), प्रशांत धंगेकर (९९२१३७७९८८), देवेंद्र ढोकळे (८७००४१२६३३) व चेतन कड (७२७६६७८८९३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर नोंदणी करावी: ://./९१ अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### संगमनेरमध्ये १२० किलो गोमांस जप्त

यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, अंमलदार गणेश लबडे, दीपक घाटकर, विजय पवार, गणेश लोंढे, सोमनाथ झांबरे, संतोष खैरे, चालक संजय काशिनाथ अरुण यांच्या पथकाने केली.